| MHLA150007792015 | | | |
|---|---|---|---|
| | प्राप्त दिनांक | : | ०६/१०/२०१५ |
| | नोंदणी दिनांक | : | ०६/१०/२०१५ |
| | निकाल दिनांक | : | १३/०३/२०२६ |
| | कालावधी | : | १०व. ०५म. ०७दि. |

**भाग– अ**

फॉर्म क्र. XXXII

(न्यायनिर्णयाचे शिर्षक पान)

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (I))

| | | |
|---|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालय क्र.१ चाकूर ता. चाकूर जि. लातूर यांचे न्यायालयात**<br>(पिठासीन अधिकारी – व्ही.एस. वाघमोडे यांच्या समोर.) | |
| | **नियमीत फौजदारी खटला क्र.१३१/२०१५**<br>नि.क्र. | |
| फिर्यादी | महा. शासन द्वारा– पोलीस ठाणे चाकूर, ता. चाकूर जि. लातूर | |
| सहा. सरकारी अभियोक्ता | | श्रीमती पी.एस. भराडीया |
| आरोपी | १. | अनिल शिवाजी जाधव,<br>वय – २२ वर्ष, |
| | २. | सागर श्रीराम शिंदाळकर,<br>वय – ३२ वर्ष, |
| | ३. | संजय बालाजी कदम,<br>वय – २१ वर्ष, |
| | ४. | चंद्रशेखर उर्फ शेखर सुधाकर धामणगावकर,<br>वय – २३ वर्ष, |
| | ५. | मनोज अंगदराव शिंदाळकर,<br>वय – २२ वर्ष, |

| | | |
|---|---|---|
| | ६. | गोविंद नरसिंग धामणगावकर,<br>वय – २२ वर्ष, |
| | ७. | धोंडीराम केरबा पिसाटे,<br>वय – २० वर्ष, |
| | ८. | महेश रामराव राजमाने,<br>वय – २६ वर्ष, |
| | ९. | दत्ता बालाजी शिंदाळकर,<br>वय – २३ वर्ष,<br>सर्व रा. नळेगांव ता. चाकूर जि. लातूर |
| आरोपींचे विधीज्ञ | | श्री. के.बी. पाटील, आरोपी क्र. १ ते ७ व ९ करीता.<br>श्री. एन.जी. काळे, आरोपी क्र. ८ करीता. |

**भाग – ब**

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | २७/०१/२०१५ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | २७/०१/२०१५ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | ०६/१०/२०१५ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | २१/०४/२०१८ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २१/०४/२०१८ |
| न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | -- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १३/०३/२०२६ |
| जर, दोषसिध्दी झाली असेल तर शिक्षा फर्माविण्याचा दिनांक | - - |

## आरोपीचा तपशिल

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हा कलम | दोषमुक्ती किंवा दोषसिध्दी | शिक्षा | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनिल शिवाजी जाधव | दि. ०१.०२.२० | दि.१०.०२.२०१५ | भा दं वि कलम १४३,१४८,३४१, | दोषमुक्त. | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १५ | | ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे. | | -- | -- |
| २ | सागर श्रीराम शिंदाळकर, | दि. ०१.०२.२० १५ | दि.१०.०२.२ ०१५ | भा दं वि कलम १४३, १४८, ३४१, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |
| ३ | संजय बालाजी कदम, | दि. ०१.०२.२० १५ | दि.१०.०२.२ ०१५ | भा दं वि कलम १४३, १४८, ३४१, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |
| ४ | चंद्रशेखर सुधाकर धामणगावकर, | दि. ०१.०२.२० १५ | दि.१०.०२.२ ०१५ | भा दं वि कलम १४३, १४८, ३४१, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |
| ५ | मनोज अंगदराव शिंदाळकर | दि. ०१.०२.२० १५ | दि.१०.०२.२ ०१५ | भा दं वि कलम १४३, १४८, ३४१, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |
| ६ | गोविंद नरसिंग धामणगावर | दि. ०१.०२.२० १५ | दि.१०.०२.२ ०१५ | भा दं वि कलम १४३, १४८, ३४१, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |
| ७ | धोंडीराम केरबा पिसाटे | दि. ०१.०२.२० १५ | दि.१०.०२.२ ०१५ | भा दं वि कलम १४३, १४८, ३४१, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |
| ८ | महेश रामराव राजमाने | दि. ०१.०२.२० १५ | दि.१०.०२.२ ०१५ | भा दं वि कलम १४३, १४८, ३४१, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |
| ९ | दत्ता बालाजी शिंदाळकर, | दि. ०१.०२.२० १५ | दि.१०.०२.२ ०१५ | भा दं वि कलम १४३, १४८, ३४१, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |

## भाग 'क'

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (iii))

## अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ न्यायालयीन साक्षीदार यांची यादी.

**–अभियोगपक्ष –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०१ | महमंदशफी इस्माईल कुरेशी | जप्ती पंच साक्षीदार |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०२ | शादुल अब्दुलगणी खुरेशी | फिर्यादी |

ब– **–बचावपक्षाचे साक्षीदार –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | –– | – |

क– **–न्यायालयीन साक्षीदार –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | –– | – |

अभियोगपक्ष/ बचावपक्ष / न्यायालय, यांचे निशाणी यादी

अ– **–अभियोगपक्ष–**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| १ | नि.क्र. ९८ | साक्षीदार क्र. १ याची सही |
| २ | नि.क्र. ९९ | तडजोड पुरशिस |

ब – **–बचावपक्ष–**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| -- | -- | -- |

क – –न्यायालयाचे निशाणी क्रमांक –

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| -- | -- | -- |

ड – न्यायालय निशाणी कागदपत्रांची यादी

| अनु.क्र. | कागदपत्रे | निशाणी क्र. |
|---|---|---|
| | -- | -- |

इ. –भौतिक वस्तु–

| अनु.क्र. | भौतिक वस्तु क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| ०१ | -- | -- |

**– न्यायनिर्णय –**

(पारीत दिनांक १३.०३.२०२६)

प्रस्तुत प्रकरणात आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम १४३, १४८, ३४१, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये अपराध केले बाबत खटला चालवण्यात आला.

अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे आहे.

२. दि. २७.०१.२०१५ रोजी सकाळी ०५.०० वा. फिर्यादी शादुल अब्दुल गणी कुरेशी हे जनावरांच्या व्यापारानिमित्य नळेगाव येथे आले होते. त्यांच्या सोबत जनावराचे व्यापारी बाबुमियाँ जिलानी, महमद इसाक अली कुरेशी रा. हैदराबाद हे पण जनावराच्या व्यापारासाठी नळेगाव येथे आले होते. ते जनावरे खरेदी करुन ट्रक क्र. ए.पी.–२८–टी.सी.–९४७६ मधून हैद्राबादकडे जाण्यास निघाले. १४.०० वा. नळेगाव ते उदगीर रोडवर घरणी टि पॉईट जवळ आले असता आरोपी मोटार सायकलवरुन ट्रकपुढे आले व ट्रक साईडला घे, म्हणून

शिवीगाळ केली. ट्कच्या कॅबीनमध्ये बसलेले महमद इसाक कुरेशी, यास बाहेर काढले व लोखंडी रोडने डाव्या पायावर मारले व इतरांनी लाथा बुक्यांनी मारले. आरोपींनी फिर्यादीला पण ट्कच्या बाहेर ओढून मारहाण केली. तसेच मेहराज महमुद खुरेशी यास पण लोखंडी रॉडने मारहाण केली. आरोपी हे वेग वेगळया मोटार सायकलवर आले होते. ट्कमध्ये जनावरे घेऊन का जाता, म्हणून आरोपींनी ट्क अडवून मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीने सदरची तक्रार दिली.

३. प्रस्तुतच्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस ठाणे चाकूर येथे गु.र.क्रमांक ३२/२०१५ भा.दं.वि. कलम १४७, १४८, ३४१, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी श्री. एस.एन. लहाने, स.पो.नि. पो.स्टे. चाकूर यांनी तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा केला. साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले, वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले आणि तपास पूर्ण झालेनंतर आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. दि. ३०.०१.२०१५ रोजी जा.क्र. ३२/२०१५ नुसार तपासी अधिकारी यांनी भादवि. कलम ३९५ वाढ करण्याबाबत अर्ज दिला होता. परंतू तपासांती आरोपी विरुध्द भादवि कलम १४७,१४८,१४९, ३४१,३२३,३२४,५०४, ५०६ नुसार दोषारोपपत्र दाखल केले.

४. वरील गुन्हयास अनुसरुन मा. पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द दोषारोप नि.क्र.५३ नुसार भादवि कलम १४३, १४८, ३४१, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ नुसार ठेवून आरोपांचे स्वरुप समजावून सांगितले असता आरोपींनी त्यांच्यावरील आरोप नाकारुन खटला पुढे चालविण्याची विनंती केली व त्याबाबतचे निवेदन नि.क्र.५४ ते ६२ वर दाखल आहे. आरोपींविरुध्द कांही एक पुरावा न आल्याने फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणेचे बयाण नोंदविण्यात आले नाही.

५. निर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.२७.०१.२०१५ रोजी १४.०० वा. मौजे नळेगांव ता. चाकूर जि. लातूर शिवारातील नळेगाव ते उदगीर रोडवर, घरणी टी पॉईटवर आरोपी हे त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्ततेकरीता बेकायदेशिर जमावाचे घटक बनले व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम १४३ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय ? | ..नकारार्थी |
| २. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी हे त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्ततेकरीता बेकायदेशिर जमावाचे घटक बनून प्राणघातक शस्त्रासह दंगा केला व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम १४८ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय? | ..नकारार्थी |
| ३. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी हे त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्ततेकरीता बेकायदेशिर जमावाचे घटक बनून फिर्यादी व साक्षीदार यांना गैरपणे निरुध्द केले व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ३४१ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय? | ..नकारार्थी |
| ४. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी हे त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्ततेकरीता बेकायदेशिर जमावाचे घटक बनून ईच्छापुर्वक फिर्यादी व साक्षीदार यांना लोखंडी रॉडने मारहाण करुन दुखापत केली व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ३२४ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय? | ..नकारार्थी |
| ५. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी हे त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्ततेकरीता बेकायदेशिर जमावाचे घटक बनून फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन त्यांना अपमानित केले व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ५०४ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली काय ? | ..नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ६. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी हे त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्ततेकरीता बेकायदेशिर जमावाचे घटक बनून ईच्छापुर्वक फिर्यादी व साक्षीदार यांना जिवे ठार मारण्याची धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा दाखविला व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ५०६ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली काय ? | ..नकारार्थी |
| ७. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**<u>का र ण मि मां सा</u>**

**<u>मुद्दे क्र. १ ते ७ करीता</u> –**

६. चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता मुद्दे क्र. १ ते ६ हे एकत्रीतरित्या चर्चेस घेण्यात आलेले आहेत.

७. अभियोगपक्षाचे साक्षीदार क्र. १ महमदशफी इस्माईल कुरेशी यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले की, दि.०२.०२.२०१५ रोजी पोलीसांनी दुरक्षेत्र नळेगाव येथे त्यांना जप्ती पंचनामा करण्यासाठी बोलाविले नाही. त्यांच्या समक्ष अनिल शिवाजी जाधव व संजय बालाजी कदम यांच्याकडून लोखंडी गज जप्त करण्यात आले नाही व त्याबाबत स्वतंत्र दोन जप्ती पंचनामा केले नाहीत. त्यातील मजकूर त्यांना मान्य नाही. तसेच सदर साक्षीदाराने अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये त्यांच्या समक्ष आरोपींनी लोखंडी गज हजर केला व तसा जप्ती पंचनामा केल्याचे नाकारले.

८. अभियोगपक्षाचे महत्वाचे साक्षीदार फिर्यादी शादुल अब्दुलगणी खुरेशी यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले की, घटना कधी, किती वाजता व कोठे घडली हे त्यांना आठवत नाही. पोलीस ठाण्यात दिलेली फिर्याद त्यांना आठवत नाही. फिर्यादमधील मजकूर काय लिहीलेला आहे व कशाबाबत लिहीलेला आहे हे त्यांना माहीत नाही, त्यावर त्यांचा फक्त अंगठा आहे. तसेच आरोपींनी त्यांचा ट्क अडवून त्यांना मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी

दिल्याचे त्यांना आठवत नाही. अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये त्यांनी नाकारले की, आरोपींनी त्यांचा ट्रक् अडवून लोखंडी रॉडने मारहाण केली. परंतू त्यांनी हे मान्य केले की, त्यांच्यामध्ये व आरोपीमध्ये तडजोड झाल्यामुळे तडजोडपत्र नि.क्र. ९९ दाखल केले. अधोरेखांकीत भाग-अ प्रमाणे त्यांनी जबाब दिलेला नाही.

९. सदर प्रकरणामध्ये घटनास्थळ जप्ती पंचनामा व जखमेचे प्रमाणपत्र मान्य करण्यात आले असले तरी स्वतः फिर्यादी यांनी अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासामध्ये सर्व बाबी नाकारल्या आहेत. तसेच फिर्यादी उलट तपासामध्ये असे मान्य केले आहे की, त्यांच्या मध्ये व आरोपी मध्ये न्यायालयाच्या बाहेर तडजोड झाली आहे व त्याबाबतची पुरसीस नि.क्र.९९ वर दाखल करण्यात आलेली आहे. यावरुन आरोपींविरुदध कोणत्याही गुन्हया बाबत न्यायालयासमोर पुरावा आलेला नाही. यातील जखमी साक्षीदार महंम्मद इसाक खुरेशी व मेहराज मेहमुद खुरेशी यांना वेळोवेळी साक्षी समन्स काढण्यात आले, परंतू त्यांचा पत्ता अपुरा असल्याबाबत व ते साक्षीदार त्यामुळे मिळत नसल्याबाबत नि.क्र. १०० वर अहवाल दाखल करण्यात आला आहे. अभियोगपक्षाने सदरचे महत्वाचे साक्षीदार यांना या प्रकरणात हजर करुन तपासले नाही.

१०. वरील चर्चेवरुन अभियोगपक्षाचे महत्वाचे साक्षीदार फिर्यादी यांनी अभियोगपक्षाला सहकार्य न केल्याने आरोपींनी वर नमुद गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाला निःसंशयपणे शाबीत करता आली नाही. त्यामुळे मुद्दे क्र. १ ते ६ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते. तसेच मुद्दा क्र.७ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

| | |
|---|---|
| १. | आरोपी अनिल शिवाजी जाधव, सागर श्रीराम शिंदाळकर, संजय बालाजी कदम,चंद्रशेखर उर्फ शेखर सुधाकर धामणगावकर, मनोज अंगदराव शिंदाळकर, गोविंद नरसिंग धामणगावकर, धोंडीराम केरबा |

| | |
|---|---|
| | पिसाटे, महेश रामराव राजमाने, दत्ता बालाजी शिंदाळकर यांना भारतीय दंड विधान कलम १४३, १४८, ३४१, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | प्रकरणातील जप्त मुद्देमाल दोन लोखंडी गज, मुल्यहिन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावे. |
| ३. | आरोपींनी पुर्वीच दिलेले वैयक्तिक बंधपत्र व जात मुचलका हे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–ए च्या तरतुदी करीता आव्हान कालावधीपर्यंत कायम करण्यात येत आहे. |
| ४. | (सदरहू न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.) |

Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2026.03.16 14:54:15 +0530

दिनांक – १३.०३.२०२६

(व्ही.एस. वाघमोडे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, चाकूर.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | : | M. B. Pathan |
| Name of the Court | : | Civil Judge J.D. & J.M.F.C, Chakur. |
| Date of Order/ Judgment | : | 13/03/2026 |
| Order/Judgment signed by Presiding Officer on | : | 16/03/2026 |
| Order/Judgment uploaded on | : | 16/03/2026 |